गडचिरोली अगरबत्ती प्रकल्पाचे प्रशासकीय नियंत्रण व जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांचेकडे सोपविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२०३/फ-९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०८ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१. शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्र. इएसटी-२०१३/प्र.क्र.६४/फ-९, दिनांक ०४ डिसेंबर, २०१४
२. शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्र. बांबूसा-२०१५/प्र.क्र.१३९/फ-९, दिनांक ०६ ऑगस्ट, २०१६
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.भावसे/प्रस्ताव/प्र.क्र.१(१६-१७)/कक्ष-९/२९८३/१७-१८, दिनांक २९.०१.२०१८

प्रस्तावना:-

बांबू क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीकोनातून बांबू व बांबूवर आधारित लघुउद्योग क्षेत्राला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने तसेच शास्त्रोक्त पध्दतीने बांबू लागवड व औद्योगिक वापरासाठी व प्रसार करण्यासाठी संदर्भाधिन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य बांबू विकास मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या स्थापनेच्या धोरणात्मक निर्णयानुसार राज्यात वनक्षेत्रात / लगत बांबू आधारीत सुरु असलेल्या लघु उद्योगाना जसे गडचिरोली अगरबत्ती प्रकल्प इत्यादीच्या विकासासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे हे मंडळाचे कार्य आहे. त्यासाठी सदर क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याच्यादृष्टीने त्यावर विशेष लक्ष देण्याकरीता महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापना झालेली आहे.

गडचिरोली अगरबत्ती प्रकल्पामध्ये (GAP) अगरबत्ती तयार होण्याचे केंद्र किंवा अगरबत्ती गोल कांडी (Round Stick) तयार करण्याचे तीन कारखाने (कुरखेडा, घोट, आलापल्ली) या ठिकाणांचा समावेश आहे. गडचिरोली अगरबत्ती प्रकल्पाची सध्या प्रशासकीय व आर्थिक जबाबदारी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली योचेकडे आहे.

संदर्भ क्र.३ अन्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी गडचिरोली येथील अगरबत्ती प्रकल्पाची या केंद्राचे प्रशासकीय जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडे हस्तांतर करण्याची शिफारस केली आहे. त्याअनुषंगाने गडचिरोली येथील अगरबत्ती प्रकल्पाची या केंद्राचे प्रशासकीय नियंत्रण व जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडे हस्तांतर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

गडचिरोली अगरबत्ती प्रकल्पाचे प्रशासकीय नियंत्रण व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडे हस्तांतर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

गडचिरोली अगरबत्ती प्रकल्पाच्या कामावर देखरेख करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यकारी समिती गठीत करण्यात येत आहे:-

१.	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर	:	अध्यक्ष
२.	मुख्य वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली	:	सहअध्यक्ष
३.	जिल्हाधिकारी, गडचिरोली	:	सहअध्यक्ष
४.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली	:	सदस्य
५.	संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली	:	सदस्य
६.	उपवनसंरक्षक, गडचिरोली वन विभाग	:	सदस्य सचिव
७.	उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग	:	सदस्य
८.	उपवनसंरक्षक, वडसा वनविभाग	:	सदस्य
९.	उपवनसंरक्षक, भामरागड वनविभाग	:	सदस्य
१०.	उपवनसंरक्षक, सिरोंचा वनविभाग	:	सदस्य
११.	महा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली	:	सदस्य
१२.	अगरबत्ती संबंधीत उद्योग क्षेत्रातील एक प्रतिनिधी	:	सदस्य

सदर समिती प्रत्येक तिमाहीत किमान एक वेळा सभा आयोजित करुन गडचिरोली अगरबत्ती प्रकल्पाच्या कामाचा आढावा घेईल व प्रकल्पाच्या अमलबजावणी मध्ये येत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी उपाययोजना करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०८१६३९३०७४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2018.02.08 16:45:22 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. आयुक्त, आदिवासी विभाग
६. जिल्हाधिकारी, गडचिरोली
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर
८. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली
९. मुख्य वनसंरक्षक (संसाधन उपयोग) महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. महा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली
११. संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली, चंद्रपूर
१२. उपवनसंरक्षक, गडचिरोली/वडसा/आलापल्ली/भांमरागड/सिरोंचा
१३. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)